# दत्त संप्रदायातील श्री नृसिंह सरस्वतींचे कार्य

प्रा. सुनिता पांडे

**प्रस्तावना**

वेदकाळात कर्मबहुल अशी यज्ञ संस्कृती अस्तित्वात होती. ज्यावेळी समाजाला यज्ञयाग परवडेनासे झाले त्यावेळी समाजाने उपासना मार्ग स्विकारला. भारतावर अनेक आक्रमणे झालीत परंतू या उपासनेमुळे भारतीय एकात्मकता टिकून राहिली. अशा या उपासना संप्रदायात 'दत्तसंप्रदाय' हा प्राचीन लोकाभिमूख असा संप्रदाय राहिला. आजही प्रवाही स्वरूपात हा संप्रदाय जीवंत आहे. 'महाराष्ट्र प्रांत'[1] त्याचे मुख्य केंद्र आहे. दत्तसंप्रदायाचे वैशिष्टये म्हणजे हा संप्रदाय लोकाभिमुख तर आहेच तसेच सर्वसमावेशक आणि समन्वयवादी आहे. 'प्रवृत्तीची गंगा, निवृत्तीची यमुना, ज्ञानाची सरस्वती'[2] यांचा सुरेख संगम या संप्रदायात आहे. या संप्रदायाचा प्रमुख ग्रंथ म्हणजे 'श्रीगुरूचरित्र'[3] होय कुणाचीही असुया किंवा मत्सर न करणारी माता अनुसया आणि ज्यांच्यात त्रिगुणोद्‌भव विकार नाहीत असे पिता अ़त्री यांचा पुत्र श्रीदत्त होय. यांच्यापासून दत्त संप्रदायांची सुरवाात झाली. परात्मशक्तीने अत्री आणि अनुसूया या दांपत्याला श्री दत्त हा दान दिला. दान नेलेला म्हणून तो दत्तात्रय झाला. याचा अर्थ श्री दत्त हे अयोनिज होते.

हा संप्रदायाचा कुठल्याही मर्त्य गोष्टींचा संग्रह करीत नाही. त्यागावर या संप्रदायाचा विश्वास आहे. म्हणूनच विरक्त विरागी वृत्तीच्या हया दत्त संप्रदायातील महापुरूषांना अवधूत म्हंटले जाते .[4] श्री दत्तात्रय यांची तीन मुखे ही ब्रम्हा–विष्णू–महेश यांची प्रतीके आहेत. यावरून 'सर्ग–स्थिती–प्रलय यांचा बोध होतो. या दत्तप्रभूंचे तीन पूर्णावतार झाले असे मानले जाते. 1) श्रीपाद श्रीवल्लभ 2) श्री नृसिंह सरस्वती 3) अक्कलकोटचे स्वामी समर्थ,

श्रीपाद श्रीवल्लभः–

श्रीपाद श्रीवल्लभांचा जन्म 14 व्या शतकात पिठापूरला अप्पळराज आणि सुमतीदेवींच्या पोटी झाला. उपनयन संस्कार होताच त्यांच्या मुखातून चारही वेदांचा उच्चार झाला. दत्तसंप्रदायाचा प्रसार करत ते भारतभर फिरले शेवटी ते कृष्णेकाठी कुरवपूरला आले. कृष्णातटावर स्नान करत असतांना एक अंबिका नावाची ब्राम्हण स्त्री आपल्या मतीमंद मुलासह कृष्णेत आत्मघात करण्यासाठी आली होती. यती दिसल्यानंतर ती स्त्री नमस्कार करायला गेली. श्रीपादांनी तीला आत्मघात करू नये असे सुचवले. त्यावेळी ती स्त्री म्हणाली जन्मोजन्मी असा मतिमंद मुलगा नसावा आपल्या सारख्या ज्ञानी पुत्राची प्राप्ती व्हावी. शुद्ध भक्ती युक्त अंतःकरणाने त्या स्त्रीने प्रार्थना केली होती. श्रीपाद श्रीवल्लभ म्हणाले 'तू शनीप्रदोषाच्या दिवशी शंकराची पूजा करावी तुला माझ्या सारखा पुत्र होईल'.[5] असे सांगून तिच्या मतिमंद मुलास ज्ञानसंपन्न करून स्वामी गुप्त झाले. पूढे कुरवपूर या ठिकाणी श्रीपाद श्रीवल्लभ निजानंद गमनाला गेले. हा दिवस गुरूद्वादशी म्हणून आजही पाळला जातो.

श्री नृसिंह सरस्वतीः–

श्री नृसिंह सरस्वतींनी भारतीय धर्मामध्ये पूर्नजन्माला मान्यता दिली आहे. कुरूवपुरातील अंबिका नावाच्या स्त्रीने अंबाभवानी यानावाने व–हाडातील कारंजानगरात जन्म घेतला. त्यांचा विवाह शुक्ल यजुर्वेदिय ब्राम्हण कुळातील काळे घराण्यातील माधवरावांशी झाला. याच दांपत्याच्या पोटी शके 1300 इ. स. 1378 ला नरहरी नावाचा मुलगा जन्माला आला. हेच दत्तात्रयाचा दुसरा अवतार 'श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज होय'[6] यांनीच भारतभर पायी भ्रमण करून

सी.पी.ॲण्ड बेरार महाविद्यालय, नागपूर
इतिहास विभाग

दत्तसंप्रदाय वाढवला. अनेक शिष्य निर्माण केले समाज जागृती केली.

उद्दिष्टेः—

श्री नृसिंह सरस्वतींचा कार्यकाल इ.स. 1378 ते 1458 मानल्या जातो. या काळात मुसलमानी सत्ता भारतात मजबुत झाली होती. अल्लाउद्दीन खिलजींच्या काळात मुस्लिम धर्म दक्षिणेत रामेश्वर पर्यंत पोहचला होता. हिंदू धर्माची अवस्था दिनवाणी होती. अशा वेळेला समाजात चैतन्य निर्माण करण्याचे समाजात जागृती करण्याचे कार्य दततसंप्रदायामार्फत श्री नृसिंह सरस्वतींनी केले.

1) गौतम बुद्धाच्या उदयापासून वैदिक धर्मावर व भारतीय अध्यात्मावर आघात व्हायला सुरवात झाली होती. मुस्लिमांच्या काळात तर भारतातील आध्यात्मीक प्रवाह गढूळ होत चालला होता. त्यामुळे भारतीय जीवनाची परत नैतिक पायावर उभारणी करणे त्यांचे उद्दीष्ट होते.

2) ज्ञानाचा प्रकाश सामाजावर टाकून हिंदू धर्मियांमध्ये आपल्या धर्माचे अस्तित्व टिकवण्याची जिद्द त्यांना निर्माण करावयाची होती.

3) राज्यकर्ते परधर्मीय असल्यामुळे समाज त्याच्या जाचाखाली भरडल्या जात होता. उदरभरणासाठी देखिल यवनांचे दास्यत्व स्विकारण्याची वेळ हिंदूंवर आली होती. या पिडीत लोकांविषयी त्यांना करूणा वाटत होती. त्यांना दुःखमुक्त करावयाचे तर होतेच. पण त्यांना भारतीय अध्यात्माच्या नाळेशी पण जोडून ठेवायचे होते.

श्री नृसिंह सरस्वतीचे बालपण :—

श्री नृसिंह सरस्वतींचा जन्म ज्यावेळी झाला त्यावेळी दिल्लीवर फिरोजशहा तुघलकाचे राज्य होते. दक्षिणेत बहामनी आणि विजयनगरच्या साम्राज्याचा उदय झाला होता. या काळात नृसिंह सरस्वतींचा 1378 ला जन्म झाला. उपनयन संस्कार होईपर्यंत त्यांनी ओंकार शिवाय दुसरा शब्द पण उच्चारला नव्हता. त्यामुळे आपला बाळ मुका आहे का याबद्दल मातापिता सचिंत होते. पण व्रतबंध झाल्यानंतर मातेजवळ भिक्षा मागायला गेले तेव्हा वेदातील मंत्र म्हणून दाखविले. उपनयन संस्कार झाल्यावर त्यांनी मातेकडे संन्यास घेण्यासाठी बाहेर पडण्याची आज्ञा मागितली. मातेच्या आग्रहावरून एक वर्ष घरी राहून हा आठ वर्षाचा मुलगा केदारेश्वरास जाण्याच्या इराद्याने बाहेर पडला. कारंजावरून काशीक्षेत्री ते आले. काशीच्या वास्तव्यात हा लहान बटू त्रिकाळ मनकर्णिका घाटावर स्नान करून ब्रम्हचर्याला उचीत असे धार्मिक कार्य करत असे. कृष्णनरहरी नावाच्या संन्याशाची नजर पण या मुलावर होतीच अन्य लोकांशी चर्चा करून त्यांनी नरहरीला संन्यास घेण्यासंबंधी विचारणा केली. आपले भाग्य समजून त्या बालकाने संन्यास घेतला कृष्ण सरस्वतींनी त्यांचे दिक्षांत नाव 'श्री नृसिंह सरस्वती' [7] ठेवले.

श्री नृसिंह सरस्वतींची भ्रमंती :—

श्री नृसिंह सरस्वती काही काळ काशीत राहिले पारमार्थिक योग्यता, वैराग्य आणि ज्ञान यामुळे अनेक लोक त्यांच्याकडे आकर्षित होऊ लागले. अनेक लोकांसोबत बद्रीकेदारनाथचे दर्शन घेतल्यानंतर ते परत प्रयागला आले असतांना माधव नावाच्या मुलाने त्यांच्याकडून दिक्षा घेतली. माधवचा माधव सरस्वती झाला.

आठवर्षाच्या नरहरीने घर सोडले होते. ते आता श्री नृसिंह सरस्वती झाल्यावर वयाच्या तिसाव्या वर्षी कारंजा नगरात आपल्या घरी आले. आईवडिलांकडे जाण्याची आज्ञा ज्यावेळी मागितली त्यावेळी अंबाभवानीच्या नेत्रातून अश्रू वाहू लागले. 'माडीवरील एका भिंतीवर गंध शिंपडून आईला म्हणाले निरांजन लावून शुद्ध अंतकरणाने या भिंतीकडे पाहा माझे दर्शन होईल'[8] असे सांगितले . श्री नृसिंह सरस्वती नांदेडला आले असतांना एका व्याधिग्रस्त माणसाला सांयदेवाच्या हातून औषधपाणी तर करवलेच, सायंदेवाच्या घरी गेल्यानंतर त्या व्याधीग्रस्त माणसाला शेजारी बसवून जेवु घातले व त्याची व्याधीतून मुक्तता केली. सायंदेवला सुलतानाला भेटायला जायचे होते. पण शिक्षेच्या भितीपोटी तो घाबरत होता त्याला देखिल सुलतानाकडे बिनधास्त जायला सांगितले. सायंदेवाने स्वामींचे शिष्यत्व स्विकारले. परळीवैजनाथला काही काळ राहिल्यानंतर एक वर्ष अज्ञातवासात घालवले. एक चातुर्मास औदुंबरला केल्यानंतर स्वामिंनी कृष्णा पंचगंगेच्या संगमावर बारा वर्ष वास्तव्य केले. ते ठिकाण नरसोबाची वाडी म्हणून

उदयाला आले. भीमा अमरजा संगमावर दोन तप वास्तव्य केले. या काळात त्यांनी अनेकांची दुःखातून मुक्तता केली. रत्नाई नावाच्या पूर्वजन्मातील बहिणीला त्यांनी इथेच उपदेश केला होता. एका शिष्याच्या विनंतीवरून लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी एका मठाची स्थापना केली. लोकांचा त्रास वाढू लागल्याने तीर्थयात्रेचे निमीत्य करून गाणगापूर सोडायचे ठरवले अर्थात शिष्यांना त्याचे वाईट वाटत होते. त्यावेळला स्वामी म्हणाले 'मी देहाने दृष्य रूपात देहाने येथे नसलो तरी गुप्त रीतीने माझे वास्तव्य येथेच आहे. माझ्या पादूका मी येथे ठेवून जात आहे.'[9] असे म्हणून स्वामी श्री शैल पर्वतावर निजानंदाला गेले. जवळपास साडेतिनशे वर्षानंतर श्री शैल पर्वतावरून अक्कलकोट स्वामींचा उदय झाला होता.

या सर्व प्रवासात स्वामींचा अनेकांशी संबंध आला, अनेकांनी त्यांचे शिष्यत्व स्विकारले, वैदिक धर्माचे महत्व सांगितले.

मुल्यमापन :—

श्री नृसिंह सरस्वतींचा जन्म शके 1300 ला झाला शके 1380 ला ले निजानंदाला गेले एकुण त्यांचा 80 वर्षांचा जीवन प्रवास होता. उपनयन संस्कार झाल्यानंतर अतिशय लहान वयात घराच्या बाहेर पडल्यानंतर काशीला त्यांना गुरू कडून सन्यास दिक्षा मिळाली. संपूर्ण भारतात त्यांनी पायी प्रवास केला. दत्त संप्रदायाचा प्रसार केला. नरसोबाची वाडी, गांणगापूर, औदुंबर दत्तप्रसायासाठी तिर्थक्षेत्र बनली. पारमार्थिक तेज त्यांचे शुद्ध आणि वैराग्यशील आचरण आणि तपसामर्थ्य यामुळे त्यांचे नाव सर्वत्र पसरले, अनेकांची व्याधीतून मुक्तता केली. पारमार्थिक उपदेश केला. हिंदूधर्मात नवी चेतना निर्माण केली. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र तसेच उत्तर प्रदेशाच्या लोकांचा त्यांच्याशी जास्त संबंध आला. ते दत्तसंप्रदायाचे प्रवर्तक असले तरी त्यांनी लोकांना गणपती, शीव, विष्णू, देवी, नरसिंह यांची उपासना करायला सांगितले. 'वैय्यक्तिक शक्तीचा न्यास विश्वशक्तीला करता येणे म्हणजे संन्यास'[10] श्री नृसिंह सरस्वतींनी मुमुक्षूंना खरा मोक्ष म्हणजे काय याचे वस्तुनिष्ठ ज्ञान दिले पूढे त्यांना सात मुख्य शिष्य लाभले. बाळकृष्ण सरस्वती, कृष्णसरस्वती, उपेंद्रसरस्वती, सदानंद सरस्वती, ज्ञानाज्योती सरस्वती, सिद्धसरस्वती व माधव सरस्वतींनी दत्तसंप्रदायाचा प्रसार केला. पूर्ण प्रवासात मुस्लिम प्रशासनाचे वेगळे अनुभव व नमुने त्यांनी पाहिले समाजाच्या क्रियाशुन्य, परवश मनोवृत्तीचे दर्शन घडले. त्यांच्या उपदेशाने समाजात जागृती, निर्भयता निर्माण व्हायला लागली.

पुज्य वासुदेवानंद सरस्वतींनी 1905 ला त्यांच्या जन्मस्थानाची कारंजाची माहिती समाजाला दिली. 1934 ला कारंजाला स्वामिंच्या मुर्तिची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. आजही श्री नृसिंह सरस्वती दत्तभक्तांसाठी परमदैवत आहे.

संदर्भ ग्रंथ :


1. प्रा. सौ. भट नम्रता — सकळ संत चरित्रगाथा — द्वितीयावृत्ती पृष्ठ क्र. 124 स्वप्नील प्रकाशन भांडूप (पूर्व) मुंबई.
2. प्रा. सौ. भट नम्रता — सकळ संत चरित्रगाथा — पृष्ठ क्र. 124 स्वप्नील प्रकाशन
3. श्री देशपांडे वामन — नित्य स्वामी दर्शन — षष्ठमावृत्ती पृष्ठ क्र. 1 मनोरमा प्रकाशन दादर (पूर्व) मुंबई.
4. श्री देशपांडे वामन — नित्य स्वामी दर्शन — षष्ठमावृत्ती पृष्ठ क्र. 1 मनोरमा प्रकाशन दादर (पूर्व) मुंबई.
5. प्रा. सौ. भट नम्रता — सकळ संत चरित्रगाथा — पृष्ठ क्र. 112 स्वप्नील प्रकाशन भांडूप (पूर्व) मुंबई.
6. प्रा. सौ. भट नम्रता — सकळ संत चरित्रगाथा — पृष्ठ क्र. 112 स्वप्नील प्रकाशन भांडूप (पूर्व) मुंबई.
7. प्रा. सौ. भट नम्रता — सकळ संत चरित्रगाथा — पृष्ठ क्र. 112 स्वप्नील प्रकाशन भांडूप (पूर्व) मुंबई.
8. प्रा. सौ. भट नम्रता — सकळ संत चरित्रगाथा — पृष्ठ क्र. 113 स्वप्नील प्रकाशन भांडूप (पूर्व) मुंबई.
9. प्रा. सौ. भट नम्रता — सकळ संत चरित्रगाथा —

पृष्ठ क्र. 114 स्वप्नील प्रकाशन भांडूप (पूर्व) मुंबई.

10. प्रा. सौ. भट नम्रता – सकळ संत चरित्रगाथा – पृष्ठ क्र. 127 स्वप्नील प्रकाशन भांडूप (पूर्व) मुंबई.

वापरलेले संदर्भग्रंथ!

1) प्रा. सौ. भट नम्रता – सकळ संत चरित्रगाथा – द्वितीयावृत्ती  पृष्ठ क्र. 114 स्वप्नील प्रकाशन भांडूप (पूर्व) मुंबई.

2) श्री देशपांडे वामन – नित्य स्वामी दर्शन – षष्ठमावृत्ती पृष्ठ क्र. 1 मनोरमा प्रकाशन दादर (पूर्व) मुंबई.

3) संपादन अक्कलकोट स्वामीदर्शन 678 दक्षिण कसबा सोलापूर त्रैमासिक जानेवारी, फेब्रुवारी, मार्च 2017.

4) संपादन अक्कलकोट स्वामीदर्शन त्रैमासिक (दिवाळी अंक )आक्टोंबर, नोव्हेंबर, डिसेंबर 2017.

5) संपादन अक्कलकोट स्वामीदर्शन त्रैमासिक ( गुरूपौर्णिमा विशेषांक ) जूलै, आगस्ट, सप्टेंबर 2017.

6) संपादन अक्कलकोट स्वामीदर्शन त्रैमासिक (दिवाळी अंक )आक्टोंबर, नोव्हेंबर, डिसेंबर 2015.